**बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली तर्फे आयोजित**

**प्रांतीय अधिवेशन - आग्रा - उत्तरप्रदेश प्रांत**

**दि. 23 जुलै 2017**

**: आयोजक :**

**महाराष्ट्र समाज आग्रा**

प्रती,

कार्याध्यक्ष / उपाध्यक्ष / महासचिव / सचिव / कोषाध्यक्ष / सहकोषाध्यक्ष आणि समस्त कार्यकारिणी सदस्य / समस्त प्रतिनिधी / उत्तरप्रदेश प्रतिनिधी / उ.प्र. आजीवन सदस्यगण तसेच अन्य इच्छुक सदस्यगण - बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली.

महोदय/महोदया,

स.न.वि.वि.

**विषय : बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली च्या सौजन्याने**
**दि.23 जुलै 2017 रोजी प्रांतीय अधिवेशन - उ.प्र प्रांत**
**आयोजक : महाराष्ट्र समाज , आग्रा, उत्तर प्रदेश**
**आपल्या उपस्थितीसाठी निवेदन**
**=====================================**

वरील संदर्भात आपल्याला सूचित करताना आनंद होतो कि बृहन्महाराष्ट्र मंडळ , नवी दिल्ली यांनी यावेळचे प्रांतीय अधिवेशन उत्तरप्रदेश प्रांतात आग्रा येथे आयोजित करण्याचा निर्णय घेऊन याचे यजमानपद **महाराष्ट्र समाज, आग्रा** यांना दिले आहे.

प्रांतीय अधिवेशनाच्या माध्यमाने महाराष्ट्राच्या बाहेर कार्यरत मराठी भाषी संस्था व व्यक्तिंचा परिचय व्हावा, त्यांना एकत्रित व संघटित करावे , त्यांच्यातील गुणांचा सन्मान व्हावा असा उद्देश ठेवून बृहन्महाराष्ट्र मंडळाने उत्तर प्रदेश प्रांताची निवड केली आहे. प्रांतीय अधिवेशनाच्या निमित्ताने आपल्या क्षेत्रातील मराठी भाषी संस्था/समाज/आजीवन सदस्य एकत्रित येतील व आपल्या क्षेत्रातील उपलब्धी बृहन्महाराष्ट्र मंडळासमोर आणतील अशी आशा आहे. छत्रपती शिवरायांच्या कर्मभूमीत आपले सर्वांचे हार्दिक स्वागत आहे.

या प्रसंगी आपणास नम्र निवेदन आहे कि आपण आग्रा येथे आयोजित प्रांतीय अधिवेशन उत्तरप्रदेश प्रांत दि. **23 जुलै 2017** रोजी सक्रिय सहभाग घ्यावा. आपण आजीवन सदस्य असल्यास सहपरिवार आणि संस्थेच्या तर्फे कमीत कमी दोन प्रतिनिधी भाग घेऊ शकता.

अधिवेशनाच्या निमित्ताने प्रकाशित केल्या जाणा-या स्मरणिकेत आपण आपल्या संस्थेची तसेच व्यक्तिगत नात्याने आपल्या व्यवसायाची/उद्योगाची जाहिरात देऊ शकता. आपल्या संस्थेचे नाव या स्मरणिकेत छापले जाणारच आहे शिवाय आपल्या व परिवारातील सदस्यांच्या काही विशिष्ट उपलब्धी असतील तर त्या सुध्दा प्रकाशित केल्या जातील. आपल्या संस्थेचे बॅनर ही कार्यस्थळी लावले जाऊ शकेल .

आपणास नम्र निवेदन आहे कि आपण या प्रांतीय अधिवेशनात सहभागी होऊन उत्तर प्रदेश प्रांताची व मराठी भाषिकांची शोभा वाढवावी व आपले नाव संपूर्ण माहितीसकट खालील पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

**डॉ. अविनाश चिवटे, अध्यक्ष, महाराष्ट्र समाज, आग्रा**

**एस-6, दुसरी मंजिल, 19/4, विमल टॉवर, संजय प्लेस, आगरा (उ.प्र.)**

अधिवेशनाबद्द्ल सविस्तर माहिती संलग्न आहे.

**नितिन सोवनी**

**संयोजक**

**प्रांतीय अधिवेशन आग्रा**

**महाराष्ट्र समाज, आग्रा**

**<u>संपर्क:</u>** श्री विकास पंडित 09319968024 / डॉ.अविनाश चिवटे-अध्यक्ष 7895823203

श्री.नितिन सोवनी - संयोजक : 09759455599 / श्री.श्रीकांत मोघे - सचिव : 7060060605

ई-मेल ; maharashtrasamajagra@gmail.com

**बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली तर्फे आयोजित**

**प्रांतीय अधिवेशन - उत्तर प्रदेश प्रांत दि. 23 -07-2017**

**आयोजक - महाराष्ट्र समाज आग्रा**

**माहिती पत्रक**

महाराष्ट्र समाज आग्रा येथे दि. **२३ जुलै २०१७** रोजी आयोजित प्रांतीय अधिवेशनाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**<u>कार्यक्रम रुपरेखा :</u>**

1. दि. **२३ जुलै २०१७** रविवार, सकाळी 10.00 ते दुपारी 12.30 पावेतो - उदघाटन कार्यक्रम
   मुख्य अतिथी : मा.श्री.राम नाईकजी, राज्यपाल, उत्तरप्रदेश
   **मा. राज्यपाल महोदयांचे आगमन असल्याने कृपया प्रोटोकॉलचे पालन करण्याची विनंती आहे.**

   **<u>प्रथम सत्र</u>** : उदघाटन समारोह : अतिथींचे स्वागत व सन्मान, स्मरणिका विमोचन, आग्रा व उत्तर प्रदेशातील गणमान्य व्यक्तींचा सन्मान, अतिथींचे संबोधन

   **भोजन अवकाश दुपारी 1 ते 2 पावेतो**

   **<u>द्वितीय सत्र</u>** : सांस्कृतिक कार्यक्रम दुपारी 2 ते 3.30 पावेतो

   **जलपान अवकाश** दुपारी 3.30 ते 4.00 पावेतो

   **<u>तृतीय सत्र</u>** : दुपारी 4.00 ते 6.00 पावेतो
   मुख्य अतिथी : मा.उच्च न्यायालय, न्यायाधीश महोदय
   गणमान्य व्यक्तींचा सन्मान , उत्तरप्रदेश संस्थागत सदस्यांचा सत्कार , बृहन्महाराष्ट्र मंडळ पदाधिकारी व कार्यकारिणीचा सन्मान , महाराष्ट्र समाज आग्राच्या कार्यकर्त्यांचा सन्मान व अधिवेशन समारोप
   **जलपान**

2. **<u>कार्यक्रम स्थळ</u>** : **Grand Hotel, Mall Road, Agra Cantt, Idgah Colony, Agra, UP- 282001**
   **आग्रा कॅन्ट रेल्वे स्टेशन पासून 5-10 मिनिट अंतरावर**
   **एअरपोर्ट पासून कमीत कमी 30 मिनिट अंतरावर**

3. **<u>निवासी व्यवस्था</u>** : हॉटेल रणजीत , 263, स्टेशन रोड , इदगाह कॉलनी , आग्रा कॅन्ट , आग्रा, उ.प्र. 282001.
4. शनीवार दि. 22.07.17 दुपार पासून दि. 23.07.2017 रविवार दि.24.07.2017 रात्री 10 पावतो कृपया आपल्या आगमन व प्रस्थानाची सूचना (दि.30 जून 2017 पावेतो) त्वरीत देण्याची कृपा करावी. त्यानुसार व्यवस्था केली जाईल. वेळेवर निवासी व्यवस्था करता येणार नाही. जे सदस्य आग्रा भ्रमणसाठी थांबतील त्यांना आपली व्यवस्था स्वत: करावी लागेल.
5. **<u>अधिवेशनाचे प्रतिनिधी शुल्क</u>** :

    वयस्क सदस्य राहणे व जेवण/नाश्ता/चहापाणी रु.750/- प्रति सदस्य

    वर्ष 5 पावेतोच्या मुलांचे कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. वय 5 च्या वर व वय 10 पावेतोच्या मुलांना रु.500/- शुल्क आकारले जाईल.

(शुल्क महाराष्ट्र समाज आग्रा च्या बँक खाता क्र. **2011148143 बँक ऑफ महाराष्ट्र, महात्मा गांधी मार्ग, आग्रा IFSC कोड MAHB0000594** किंवा डिमांड ड्राफ्ट किंवा मनीऑर्डर ने महाराष्ट्र समाज आगरा या नावे आग्रा येथे पाठवावे व तशी सूचना आम्हाला द्यावी. येताना शुल्क पाठविल्याची पावती सोबत घेऊन यावी.)

6. **<u>स्मरणिके साठी जाहिरातीचे दर खालीलप्रमाणे राहतील</u>**

    पूर्ण पान रंगीत रु. 5000/- ब्लॅक/व्हाईट रु. 3000/-

    अर्धे पान रंगीत रु. 3500/- ब्लॅक/व्हाईट रु. 2000/-/ अंतिम पान रंगीत रु. 8000/-
7. **<u>बॅनर</u> :** कार्यक्रम स्थळी बॅनर लावण्यासाठी रु.500/- शुल्क घेतले जाईल (बॅनर आणावे लागेल). बॅनर चा माप 5'X6' चे असावे. सूचना व शुल्क आधी जमा करावे लागेल.
8. स्मरणिका छापण्यापूर्वी ज्या संस्था/व्यक्तिंकडून (मराठी वा अमराठी) रु. **१०००.०० /-** च्या वर दानराशी दिली जाईल त्यांचे नाव (कोणाच्या स्मृतीप्रित्यर्थ दिल्यास त्यांचे नाव) प्रकाशित केले जाईल.
9. आपल्या संस्थेच्या उल्लेखनीय कार्यासाठी आपल्याला सन्मानीत केले जाईल यासाठी योग्य माहिती पाठविण्यात यावी. आजीवन सदस्य सुद्धा आपल्या उल्लेखनीय कार्याची माहिती देऊ शकतात.
10. आपली संस्था बृहन्महाराष्ट्राची सदस्य नसेल तरी यात सहभागी होऊ शकते. आपण कार्यस्थळी सदस्यता घेऊ शकता. (संस्थेची दिर्घकालीन सदस्यता राशी रु.2000/- पंधरा वर्षासाठी)
11. अधिवेशनाच्या वेळी उपस्थित सदस्यांची चहा/नाश्ता/जेवणाची सोय केली जाईल.

12. कृपया आजीवन सदस्य व संस्था प्रतिनिधी यांनी प्रति सदस्य (परिवारातील व्यक्तिंचे शुल्क वेगळे लागेल) आपले शुल्क बचत खाते **क्र. 2011148143 बँक ऑफ महाराष्ट्र ,महात्मा गांधी मार्ग ,आग्रा IFCS कोड MAHB0000594/** आग्रा वर आहरित डिमांड ड्राफ्ट महाराष्ट्र समाज आग्रा, आग्रा या नावे पाठवावे. डी.डी. सोबत आपले संपूर्ण नाव , पत्ता, फोन नंबर , ई-मेल, सदस्यता क्रमांक लिहून पाठवावा. संस्थागत प्रतिनिधी ने संस्थेच्या लेटरपॅड वर अध्यक्ष/सधिवांच्या हस्ताक्षराने ही माहिती पाठवावी. आपल्या संस्थेचे नाव , संस्थेचा पत्ता , फोन नंबर, संस्थेचा रजिस्ट्रेशन नंबर , तसेच स्वता:चे नाव , पद (अध्यक्ष/सचिव/ कोषाध्यक्ष/ सदस्य), फोन नंबर , स्वत:चा पत्ता , ई-मेल, शुल्क राशी , डी.डी. नंबर , बॅकेचे नाव इत्यादी माहिती व विशेष उल्लेखनीय कार्य असल्यास कळवावे.
13. **अंतिम तिथी** : आपले नाव वा प्रतिनिधी शुल्क पाठविण्याची **अंतिम तारीख 30 जून २०१७** आहे. कृपया आपल्या नावाची नोंदणी व सविस्तर माहितीसह त्वरीत खालील पत्यावर/फोनवर कळवावी व लगेच शुल्क पाठवावे.
14. **नोट -उत्तरप्रदेश शहरातील प्रसिध्द व सन्माननीय मराठी व्यक्ती/संस्थां चे सन्मान आपल्या क्षेत्रातील प्रसिध्द व गणमान्य व्यक्ती/संस्थांचे नाव त्वरीत संपूर्ण परिचय व फोटो सहित आम्हाला त्वरीत पाठविण्याची कृपा करावी.**
15. **एकदा जमा केलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत वापस केले जाणार नाही.**
16. **आग्रा भ्रमण करणा-या सदस्यांना येथील काही ट्रॅव्हल्स एजेंसीचे नाव व फोन नंबर दिले जातील. त्यांनी स्वत: संपर्क करुन आपले बुकिंग करावे.**


आयोजक

महाराष्ट्र समाज आग्रा

S-6, IInd Floor,

19/4, Vimal Tower

Sanjay Place, Agra-2

संपर्क नं. श्री विकास पंडित . ९३१९९६८०२४ / इमेल ; maharashtrasamajagra@gmail.com

प्रती,

श्रीमान कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, सहकोषाध्यक्ष महोदय आणि

समस्त कार्यकारिणी सदस्यगण,

संपाद्क बृहन माय मराठी व मराठी परीक्षा समिती प्रमुख

स.न.वि.वि.

विषय : बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्लीचे प्रांतीय अधिवेशन आग्रा येथे महाराष्ट्र समाज आग्रा तर्फे आयोजित अधिवेशन दि.23 जुलै 2017, रविवार

महोदय/महोदय,

आपल्याला सूचित करताना आनंद होतो की बृहन्महाराष्ट्र मंडळाचे यावर्षीचे प्रांतीय अधिवेशन आग्रा येथे महाराष्ट्र समाज आग्रा तर्फे दि.23 जुलै 2017 रविवार रोजी आयोजित केले जात आहे. आग्रा महाराष्ट्र समाजातर्फे आपल्याला तशी सूचना मिळालीच असेल. तरी आपल्याला अधिवेशनाचे सविस्तर परिपत्र संलग्न करीत आहे. आपण सर्वजण या अधिवेशनासाठी सादर आमंत्रित आहात. कृपया आपल्या आगमन व प्रस्थानाची सूचना आयोजंकांना व मला मेल किंवा व्हाटस अप वर देण्याची कृपा करावी. कार्यकारिणी सदस्यांना प्रतिनिधी शुल्क द्यावे लागणार नाही. जर आपण जाहिरात, बॅनर लावण्यास इच्छुक असाल तर त्याचे शुल्क देऊन आयोजकांशी संपर्क करु शकता.आपल्या क्षेत्रातील अन्य सदस्य या अधिवेशनात सहभागी होणार असतील तर कृपया वेळेच्या आत म्हणजे दि.30 जून 2017 पावेतो त्यांचे शुल्क व सूचना आयोजकांना कळवावी. त्यानुसार त्यांना व्यवस्था करणे सोयीचे जाईल. वेळेवर व्यवस्था करता येणार नाही.

अधिवेशनासंबंधी मी व्यक्तिगत रुपाने आयोजकांच्या संपर्कात असून प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या व्यवस्थेचे निरीक्षण ही केले आहे. महाराष्ट्र समाजाने प्रतिनिधी व कार्यकारिणीच्या निवासाची व्यवस्था आग्रा कॅन्ट रेल्वे स्टेशन जवळील हॉटेल रणजीत येथे केली आहे. हॉटेलच्या रुम ची व्यवस्था उत्तम आहे. रुम मध्ये कमीत कमी 3 ते 4 प्रतिनिधींची व्यवस्था केली जाईल. 30 जून नंतर रजिस्ट्रेशन केले जाणार नाही.

अधिवेशनाचे कार्यस्थळ हॉटेल ग्रॅण्ड येथे केली आहे. हॉल व लॉन अप्रतिम आहे. याबद्द्ल महाराष्ट्र समाज आग्राचे कार्य प्रशंसनीय आहे. मुख्य म्हणजे या अधिवेशनाचे उदघाटन मा.श्री. राम नाईकजी, महामहिम राज्यपाल करणार असून श्री.नितिन गडकरी यांनाही आमंत्रित केले गेले आहे. महामहिम राज्यपालांचा प्रोटोकॉल कार्यक्रम संलग्न आहे. त्यानुसार मंचावर अतिथींसह केवळ पांच व्यक्ती विराजमान होतील. अन्य माहिती सोबत संलग्न आहे.

आपण सर्वजण या कार्यक्रमात सहभागी व्हावेत ही विनंती. सोबत महाराष्ट्र समाज आग्राचे सविस्तर परिपत्र, हॉटेलचे फोटो व महामहिम राज्यपालांचे प्रोटोकॉल पत्र संलग्न आहे.

धन्यवाद.

आपला

डॉ. रवि गि-हे

महासचिव